


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**



● वर्ष : ०१ ● अंक : ३४० ● पुणे ● शुक्रवार, दि. १८ ऑक्टोबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No. - MAHMAR/2023/89313



सचिन दोडके मित्र परिवारातर्फे दुधाचे वाटप 3




विविध घटकांच्या पाठिंब्याने राष्ट्रवादी काँग्रेस सक्षम 4



दिवाळी निमित्त पुण्यातील सेनापती बापट मार्गावरील द पॅव्हेलियन मॉल येथे अप्रतिम भव्य अशा शंखाची सजावट करण्यात आली आहे, ही आकर्षक सजावट लोकांचे लक्ष वेधून घेत आहे. आकर्षक सजावटी सहित या दिवाळीत मॉल मध्ये विविध ब्रँड्सवर मोठया प्रमाणात सवलती देखील देण्यात येत आहेत.

# उलट दिशेने आल्यास वाहन जप्त !

## वाहतूक विभागाची उलट दिशेने येणाऱ्या 14 हजार वाहनांवर कारवाई



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणेकरांना शिस्त लावण्याचा वाहतूक शाखेकडून केला जातो, परंतु, दंड भरेन पण सुधारणार नाही, अशी वृत्ती ठेवून सर्रास वाहनचालक नियम मोडत असतात. अशा पुणेकरांना सरळ करण्यासाठी आता उलट दिशेने येणारी वाहने सहा महिने जप्त करण्याचा निर्णय वाहतूक शाखेने घेतला आहे. ट्रिपल सिट, ड्रंक अँड ड्राईव्ह आणि उलट दिशेने येणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध वाहतूक शाखेने मोहिम राबविण्यात येत आहे.

गेल्या 15 दिवसात वाहतूक शाखेने सुमारे 25 हजार वाहनचालकांवर कारवाई केली आहे.

पुणे शहर वाहतूक शाखेमध्ये दोन शिफ्टमध्ये 850 पोलीस अंमलदार कार्यरत असतात. त्यांनी कितीही प्रयत्न केले तरी बेशिस्त वाहनचालक, रस्त्यांची दुरावस्था, अरुंद रस्ते यामुळे शहरातील सर्वच भागात वाहतूक कोंडी दररोज होत असते.

शहरात भरधाव आणि वाहतूकीचे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. दररोज एक ते दोघांना आपल्या प्राणास मुकावे लागते.

अनेक जण गंभीर तर काही किरकोळ जखमी होत असतात. त्यामुळे बेशिस्त वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

### अवजड वाहनांना दिवसा बंदी

शहरात विविध ठिकाणी इमारतीचे बांधकाम, आणि विकास कामे सुरु आहेत. त्यासाठी डंपर, कॉंक्रीट मिक्सर अशा अवजड वाहनांची दिवसभर वाहतूक सुरु असते. त्यामुळे अनेकदा अपघात होताना दिसून येतात. त्यामुळे वर्दळीच्या वेळी सकाळी आणि सायंकाळी अवजड वाहनांवर बंदी घालण्यात आली आहे.

### १ ते १६ ऑक्टोबर दरम्यान केलेली कारवाई

उलट दिशेने जाणारे वाहनचालक – २१ हजार २८५
ट्रिपल सीट – २ हजार ८७२
ड्रंक अँड ड्राईव्ह – ५७०
जप्त वाहने – २१५

# आणखी एका काका पुतण्याची लढाई?

*कुटुंबातील सदस्य कुणाच्या बाजूने उभे राहणार याचीही उत्सुकता*



**बारामती (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेसचा अभेद्य बालेकिल्ला असलेली बारामती पक्षातील फुटीनंतर कोणत्या पवारांची हे सिद्ध करणारी विधानसभा निवडणूक अवघ्या काही दिवसांवर आली आहे. दोन्ही पक्षांकडून मतदारांना भावनिक आवाहन करण्यात येत आहे. अशात अजित पवारांना कुटुंबातूनच आव्हान मिळण्याची शक्यता आहे. अशात पवार कुटुंबातील सदस्य कुणाच्या बाजूने उभे राहणार याचीही उत्सुकता सर्वांना लागली आहे.

दरम्यान यंदा विधानसभा निवडणुकीसाठी 20 नोव्हेंबरला मतदान होणार असून 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

बारामती विधानसभा मतदारसंघात उपमुख्यमंत्री अजित पवार विरुद्ध त्यांचे पुतणे युगेंद्र पवार यांच्या लढत होण्याची दाट शक्यता आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार हे अजित पवारांसमोर आव्हान उभे करणार आहेत. काका विरुद्ध पुतण्या अशी लढत होण्याची शक्यता असल्याने अजित पवार यांना प्रथमच घरातूनच आव्हान मिळणार आहे.

दरम्यान विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांना बारामतीत अडकवून ठेवण्याचा प्रयत्न असणार आहे. तर बारामतीच्या विकासावरच अजित पवार मते मागणार आहेत.

### असे आहेत निवडणूक मुद्दे

बारामती तालुक्यातील पाण्याचा प्रश्न निवडणुकीत डोके वर काढू शकतो. वाढती गुन्हेगारी, बेरोजगारी, वाढता भ्रष्टाचार या मुद्यावर युगेंद्र पवार यांच्याकडून प्रचार होऊ शकतो. दुसरीकडे बारामतीचा गेल्या पाच वर्षांत झालेला विकास या मुद्यावर अजित पवार यांच्याकडून प्रचार होण्याची शक्यता आहे. तसेच गेल्या पाच वर्षांत साडेआठ हजार कोटींचा निधी बारामतीला दिल्याचा मुद्दा प्रामुख्याने निवडणुकीत अजित पवार यांच्याकडून उचलला जाईल.

# पुरोगामी पुण्यात मुलगी नकोशी!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ज्ञानाची कवाडे स्त्रियांना उघडे करण्यासाठी ज्या पुण्यात फुले दाम्पत्याने मुलींची पहिली शाळा उघडली, त्याच पुण्यात लेकींच्या जन्मदराबाबत अनास्था दिसून येते. गेल्या वर्षी पुणे शहर व जिल्ह्यात मुलींचा जन्मदर घटला.

एक हजार मुलांमागे केवळ 898 मुली जन्माला आल्या आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाकडे उपलब्ध असलेल्या आकडेवारीतून ही बाब उघडकीस आली आहे.

वर्षभरात मुलांच्या तुलनेत किती मुली जन्माला आल्या, त्यावरून 'लिंग गुणोत्तर प्रमाण' काढले जाते. त्यानुसार मुला-मुलींची संख्या समसमान असायला हवी. पुण्यात 2023मध्ये एक हजार मुलांमागे शहरी भागात 897 मुली, तर ग्रामीण भागात 901 इतके प्रमाण होते. यावरून अजूनही मुलीच्या जन्माचे स्वागत केले जात नसल्याचे आकडेवारीवरून दिसून येते.



● गेल्या वर्षी हजार मुलांमागे केवळ ८९७ मुली; राज्यातही प्रमाण ९०७ वर




# पुरंदर तालुक्यातील आघाडीमध्ये बिघाड?

## आघाडीचा निर्णय मान्य असेल : पवार गट : जो उमेदवार देणार त्याचे काम करणार



**नीरा (दै. आरंभ पर्व)**

पुरंदर-हवेली विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला संधी मिळावी अशी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची भूमिका आहे. ही भूमिका आम्ही वरिष्ठांकडे मांडत आहोत.

मात्र वरिष्ठ जो निर्णय घेतील त्या निर्णया बरोबरच राष्ट्रवादीचे कार्यकर्ते असतील आणि पुरंदरची राष्ट्रवादी वरिष्ठांच्या आदेशाचे पालन करेल, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाचे प्रवक्ते विजय कोलते यांनी स्पष्ट केले.

पुरंदर-हवेली विधानसभेची जागा ही राष्ट्रवादी काँग्रेसला मिळावी अशी मागणी पुरंदर तालुक्यातील पवार गटाच्यावतीने केली जात आहे.

या मागणीसाठी माजी सनदी अधिकारी संभाजी झेंडे यांच्या नेतृत्वाखाली जयंत पाटील यांच्याकडे देखील पुरंदर तालुक्यातील राष्ट्रवादीचे पदाधिकारी गेले होते. त्यामुळे पुरंदर तालुक्यातील आघाडीमध्ये बिघाड होण्याची चिन्हे निर्माण झाली होती. तर काही पदाधिकाऱ्यांनी पक्षाचा उमेदवार नसेल तर आम्ही राजीनामा देऊ, असा इशारा दिला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेससाठी पुरंदर-हवेलीची जागा मागणे हे आमचे काम आहे. आम्हाला संधी मिळाल्यास आम्ही त्याचे सोने करू; मात्र वरिष्ठांनी जर आघाडीचे काम करायचा आदेश दिला आणि त्यांनी दुसरा उमेदवार दिला तर आम्ही त्याच काम प्रामाणिकपणे करू असं पक्षाचे प्रवक्ते विजय कोलते यांनी स्पष्ट केला आहे.

कोलते म्हणाले की, पक्षाकडे उमेदवारी मागणे ही पक्षांतर्गत बाबत आहे. पुरंदर-हवेली विधानसभा मतदारसंघाबाबत आघाडीतील वरिष्ठ नेते जो निर्णय घेतील तो निर्णय सर्वांना मान्य असेल त्यांच्या सूचनेनुसार सर्वजण काम करतील.

विधानसभा 2019 च्या निवडणुकीमध्ये आमदार संजय जगताप यांनी पुढच्या वेळी आपण तुम्हाला संधी देऊ अस आश्वासन दिले होत. शरद पवार यांच्या समोरच हे घडले होते.

त्यामुळे आमदार संजय जगताप यांनी आघाडी धर्म पाळावा व मला यावेळी संधी द्यावी, अशी मागणी संभाजी झेंडे यांनी केली आहे.

या मागणीला पवारगटामधून मोठा पाठिंबा मिळू लागला आहे. मात्र यामुळे आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये कटुता निर्माण होऊ लागली. त्यामुळे झेंडे यांना उमेदवारी दिली नाही तर पक्षचा राजीनामे देवू असा इशारा देण्यातपर्यंत कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत.

● आमदार संजय जगताप यांनी आघाडी धर्म पाळावा व मला यावेळी संधी द्यावी : संभाजी झेंडे

### मतभेद नाहीत : माणिक झेंडे

आपल्या वरिष्ठांकडे उमेदवारी मागणे हे प्रत्येक कार्यकर्त्याचं काम असते. प्रत्येक कार्यकर्ता संधी मिळण्यासाठी काम करत असतो. पुरंदरमध्ये देखील आमच्या पक्षाकडून वरिष्ठांकडे उमेदवारी मागितली जात आहे. मात्र आघाडीमध्ये कोणत्याही प्रकारचे मतभेद नाहीत. वरिष्ठांचा जो निर्णय होईल तो सर्वांना मान्य असेल.



# काँग्रेसचा आरक्षण विरोधी चेहरा : राहुल गांधी



राहुल गांधी आणि त्यांचा पक्ष गेल्या लोकसभा निवडणुकांच्या वेळी संविधानाची प्रत दाखवत संविधान बचावचे नारे देत होते,परंतु इतिहासात काँग्रेस पक्षाचे धोरण कायम दलित, मागासवर्गीय व गरीबांविरोधी राहिलेले आहे. अमेरीकेतून राहुल गांधीनी "आरक्षण संपवण्याच्या " केलेल्या घोषणेमुळे काँग्रेसचा दलित, मागासवर्गीय व गरीबांविरोधाचा चेहरा पुन्हा समोर आला आहे.

स्वातंत्र्यानंतर सलग 30 वर्ष काँग्रेस पक्ष सत्तेत होता तरीही OBC आरक्षण दिले नाही.

1950 साली काका कालेलकर आयोगाने OBC आयोगाची शिफारस करूनही नेहरूंनी ही मागणी धुडकावून लावली होती.

1977 साली जनता पक्षाचे सरकार आल्यानंतर मंडल आयोगाची स्थापन केला होता.नंतर 1980 साली पुन्हा सत्तेवर आलेल्या काँग्रेस सरकारने OBC आरक्षण व मंडल आयोग बासनात गुंडाळला.

इंदिरा गांधी व राजीव गांधी मिळून 10 वर्ष सत्तेत होते तरीही त्यांनी OBC आरक्षण दिले नाही.

1990 साली भाजपा समर्थित जनता दलाचे सरकार सत्तेत आल्यावर त्यांनी मंडल आयोगाच्या शिफारसी लागू करत OBC प्रवर्गाला 27% आरक्षण दिले. हे आरक्षण मिळू नये म्हणून तत्कालीन मध्यप्रदेश काँग्रेस सरकारने या विरोधात न्यायालयात याचिका दाखल केली होती.

पूर्वाश्रमीचा महार समाज बौद्ध झाल्यावर कॉंग्रेस सरकारने बौद्धांचे आरक्षण थांबवले होते. पुढे 1990 साली व्हि.पी. सिंग यांच्या काळात ते पुन्हा सुरू करण्यात आले होते.

पंडित नेहरूचे आरक्षणाबद्दलचे विचार

पंडित जवाहरलाल नेहरू, भारताचे पहिले पंतप्रधान, यांनी आरक्षणाच्या धोरणाबद्दल, विशेषत: जेव्हा त्याचा दीर्घकालीन परिणाम होतो तेव्हा त्यावर आक्षेप व्यक्त केला होता. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित समुदायांच्या उन्नतीसाठी सकारात्मक कृतीची गरज त्यांनी मान्य करत असताना, नेहरूंनी आरक्षण हा कायमस्वरूपी उपाय होऊ नये यावर भर दिला होता. कालांतराने गुणवत्तेवर आधारित व्यवस्थेकडे वाटचाल करणे महत्त्वाचे आहे, असे त्यांचे मत होते.

SC/ST आरक्षण या विषयावर 1961 साली राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहित या आरक्षणास विरोध केला होता व दीर्घकाळापर्यंत आरक्षण धोरणांच्या संभाव्य हानीबद्दल चिंता व्यक्त केली होती. त्या पत्रात पंडित नेहरू असे म्हणतात कि "I dislike any kind of reservation, more particularly in services. I react strongly against anything which leads to inefficiency and second-rate standards. I want my country to be a first-class country in everything. The moment we encourage the second-rate, we are lost. The only real way to help a backward group is to give opportunities for good education. This includes technical education, which will fit them for entering any stream of work. It is in this way that we should help them and not by reservation of jobs."

("मला कोणत्याही प्रकारचे आरक्षण आवडत नाही, विशेषतः सेवांमध्ये. मी अशा कोणत्याही गोष्टींचा तीव्र विरोध करतो ज्या कार्यक्षमतेस आणि दुसऱ्या क्रमांकाच्या मानकांकडे नेतात. मला माझा देश प्रत्येक बाबतीत पहिल्या श्रेणीचा व्हावा असे वाटते. ज्या क्षणी आपण दुसऱ्या दर्जाच्या गोष्टींना प्रोत्साहन देतो, तेव्हा आपण हरतो. मागासलेल्या गटांना खऱ्या अर्थाने मदत करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्यांना चांगल्या शिक्षणाच्या संधी देणे, ज्यात तांत्रिक शिक्षणाचाही समावेश आहे. याच पद्धतीने आपण त्यांना मदत केली पाहिजे, आणि नोकऱ्यांच्या आरक्षणाद्वारे नाही.")

राजीव गांधींचे आरक्षणाबद्दलचे विचार

राजीव गांधी यांनी आरक्षणासंदर्भात केलेली विधाने आणि त्यांचे विचार त्यांच्या काळातील बदलत्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीशी संबंधित आहेत. 1989 साली मांडलेल्या मंडल आयोगाच्या शिफारशींवरून देशात मोठी चर्चा आणि वादविवाद सुरु झाले होते. मंडल आयोगाने केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमध्ये इतर मागासवर्गीयांसाठी (OBC) 27% आरक्षणाची शिफारस केली होती. राजीव गांधी यांनी मंडल आयोगाच्या शिफारासींवर टीका केली होती. त्यांनी असे म्हटले की, आरक्षणाच्या धोरणाचे उद्दीष्ट केवळ सामाजिक न्याय नसून, एका व्यापक दृष्टीकोनातून समाजाचे सर्वांगीण उन्नतीकरण असायला हवे. त्यांचे मत होते की, केवळ जातीच्या आधारे आरक्षण लागू केल्यास देशात सामाजिक विभाजन होण्याची शक्यता आहे. तसेच त्यांनी आरक्षणाच्या दीर्घकालीन परिणामांविषयीही चिंता व्यक्त केली होती आणि हे धोरण काही काळापुरते मर्यादित असावे अशी भूमिका मांडली होती.



## धडाकेबाज रोमँटिक ॲक्शनपट 'नाद - द हार्ड लव्ह' 25 ऑक्टोबरला प्रदर्शित होणार




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

25 ऑक्टोबरला एक धडाकेबाज रोमँटिक ॲक्शनपट मराठी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'नाद - द हार्ड लव्ह' हा प्रेमाची नवी व्याख्या सांगणारा चित्रपट खऱ्या अर्थाने मराठी चित्रपटांच्या कक्षा रुंदावणारा ठरणार आहे. 'नाद - द हार्ड लव्ह'च्या रूपात दर्जेदार निर्मितीमूल्ये असलेला संगीतप्रधान रोमँटिक चित्रपट प्रदर्शित होणार आहे. 'देवमाणूस' या मालिकेद्वारे महाराष्ट्राच्या घरोघरी लोकप्रिय झालेला अभिनेता किरण गायकवाड या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार असून, त्याचे एक वेगळेच रूप यात आहे. टिझर आणि ट्रेलरला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्यानंतर निर्माते संजय पगारे आणि रूपेश दिनकर यांनी शकुंतला क्रिएशन प्रोडक्शन आणि जिजाऊ क्रिएशन मेकरच्या बॅनरखाली बनवलेला 'नाद - द हार्ड लव्ह' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. रुपाली दिपक पवार आणि वैशाली नितीन पवार या चित्रपटाचे निर्मिती व्यवस्थापक आहेत. दिग्दर्शनाची धुरा प्रकाश जनार्दन पवार यांनी सांभाळली आहे. आपल्या कल्पक दिग्दर्शन शैलीद्वारे पवार यांनी 'नाद'मध्ये एक अनोखी प्रेमकहाणी सादर केली आहे. या चित्रपटात उदय आणि शुभ्रा यांची प्रेमकहाणी पाहायला मिळेल. या चित्रपटातील अजिंक्य ही आणखी एक महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. 'नाद' हा म्हणजे दोन प्रेमी जीवांची आवड पूर्ण करण्याचा प्रवास आहे. या चित्रपटात जरी आजवर कधीही न पाहिलेली लाल मातीतील ॲक्शनदृश्ये पाहायला मिळतील. सकस कथानकाला मुद्देसूद कथानकाची जोड आणि सहजसुंदर अभिनयाच्या साथीने सादर केलेली प्रेमकथा हे 'नाद'चं वैशिष्ट्य आहे.

या चित्रपटामध्ये दोन रोमँटिक, एक सॅड आणि एक धमाल नाचो गीत अशी एकूण चार गाणी आहेत. मराठी सिनेसृष्टीतील आजचे आघाडीचे संगीतकार पंकज पडघन यांनी गीतकार वैभव देशमुख आणि विनायक पवार यांनी लिहिलेल्या गीतांना संगीतसाज चढवला आहे. 'डोळ्यांत तूच आहे...', 'तुझ्यामुळे जिंदगी सपान वाटते रे...', 'नादखुळा डान्स करा रे...' आणि 'जीवाचे हाल...' ही चारही गाणी चित्रपटामध्ये वेगवेगळ्या प्रसंगी येतात आणि मनाला भुरळ घालतात. अर्थपूर्ण शब्दांना सुरेल संगीताची जोड हे या गाण्यांचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. नयनरम्य लोकेशन्सवर चित्रीकरण करण्यात आल्याने पडद्यावर चित्र पाहताना ते सुखावह वाटेल. किरण गायकवाडची मुख्य भूमिकेसाठी करण्यात आलेली निवड आणि त्याची सपना माने या नवोदित अभिनेत्रीसोबत जमलेली जोडी चित्रपटाचे मुख्य आकर्षण ठरणार आहे. किरण गायकवाडसाठी हा चित्रपट इमेज ब्रेकिंग ठरणारा असून, त्याने आपल्या व्यक्तिरेखेसाठी खूप मेहनत घेतल्याचे दिग्दर्शक जनार्दन पवार म्हणाले. ते म्हणाले की, चित्रपटातील व्यक्तिरेखांसाठी अचूक कलाकारांची निवड करण्यात आली आहे. किरणसारखा तगडा अभिनेता मुख्य भूमिकेत असल्याने 'नाद' एका वेगळ्याच उंचीवर पोहोचला आहे. त्याला सपनाची सुरेख साथ लाभली आहे. इतर कलाकारांनी आपापल्या व्यक्तिरेखांना न्याय देण्यासाठी खूप मेहनत घेतली आहे. यातील गाणी संगीतप्रेमींच्या ओठांवर रुंजी घालणारी असून, चित्रपटगृहातून बाहेर पडणारे प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर एक परिपूर्ण कलाकृती पाहिल्याचा आनंद पाहायला मिळेल अशी आशाही पवार यांनी व्यक्त केली आहे. संतोष दाभोळकर आणि दिपक पवार यांनी या चित्रपटाची कथा लिहिली असून, पटकथा व संवादलेखन डॉ. विनायक पवार यांनी केलं आहे.

## रस्ते झाडण्यासाठी पुणे महापालिकेची तिजोरी साफ

- कामाचा खर्च १०० कोटी रुपयांनी वाढला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरातील प्रमुख रस्त्यांचे झाडणकाम यांत्रिकीकरणाद्वारे (रोड स्वीपर) करण्यासाठी महापालिकेने पाच वर्षांसाठी 60 कोटी रुपयांची निविदा काढली होती. पण त्यात ठेकेदाराने 38 ते 80 टक्के जादा दराने निविदा भरल्याने ही निविदा रद्द केली. फेरनिविदा काढताना निविदेची व्याप्ती वाढवून पाच वर्षांऐवजी सात वर्षांची मुदत करण्यात आली. अन्य तांत्रिक गोष्टींचा समावेश केल्याने हा खर्च 163 कोटींपर्यंत गेला आहे. त्यामुळे अवघ्या चार महिन्यांत निविदा तब्बल 100 कोटींनी फुगविण्यात आली आहे. त्यामुळे रस्त्याची सफाई होणार की करांच्या रकमेतून पुणेकरांनी भरलेल्या तिजोरीची? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पूर्वीच्या निविदेत बदल करून निविदेची व्याप्ती वाढविण्यात आली. त्यामध्ये पाचऐवजी सात वर्षांची निविदा काढली. प्रत्येक परिमंडळाचा प्रतिवर्षाचा खर्च पाच कोटी 83 लाख इतका झाला आहे. यापूर्वी हा वार्षिक खर्च चार कोटी 51 लाख इतका होता. तसेच ठेकेदाराला त्याच्या गाड्यांचा वापर दोन वर्षे जास्त करता येणार असल्याने गाडीची किंमत वसूल होणार आहे.

## पुस्तक देणगीतून वाचन संस्काराला बळ : रणदिवे



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

यशस्वी जीवनासाठी शालेय काळापासुन होत असलेले वाचन संस्कार महत्वाचे असल्याचे प्रतिपादन राजगुरूनगर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांनी केले. ते येथील सार्वजनिक वाचनालयात आयोजीत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन व वाचन प्रेरणा दिन आणि पुस्तक प्रदर्शन व जिल्हा परिषद शाळांच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तके भेट कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी बोलताना रणदिवे यांनी शैक्षणिक काळापासुन झालेल्या वाचन संस्काराचे महत्व विशद केले. वाचनाने मनन, चिंतन व विचारांची शक्ती प्राप्त होते. त्यातुन आदर्श व्यक्तिमत्वाची जडण घडण होते .

यावेळी खेड तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या तोरणे बुद्रुक, चांडोली, चौधरवाडी व गोसासी विकासवाडी शाळांच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तकसंच भेट देण्यात आले .

याप्रसंगी नगरपरिषदचे रचनाकार प्रतिक भामे, बाबासाहेब गायकवाड, साविंद्रा गारगोटे, काळुराम गोरडे, अशोक सोनवणे, वाचनालयाचे अध्यक्ष प्रमोद गानु, मानद सचिव राजेंद्र सुतार, वासंती बेलसरे, प्रिया देवरे, वैशाली इष्टे, कल्पना गवळी, अक्षता मुळुक, संध्या कुलकर्णी, वैष्णवी पंचरास व विद्यार्थी आणि वाचक उपस्थित होते.



## फ्लिपकार्ट 'दिवाळी शॉपोत्सव' 2024 सह उत्सव साजरा करा




**बेंगळुरू (दै. आरंभ पर्व)**

भारतातील होमग्रोन फ्लिपकार्ट ग्रुपच्या डिजिटल बी2बी मार्केटप्लेस, फ्लिपकार्ट होलसेलने त्यांच्या बी2बी सदस्यांसाठी 9 ऑक्टोबर ते 1 नोव्हेंबर 2024 दरम्यान 'दिवाळी शॉपोत्सव' सेल सुरू करण्याची घोषणा केली. 'डील्स आपके लिए खुशियां सबके लिए' या टॅगलाइनसह, सेल इव्हेंट फ्लिपकार्ट होलसेलच्या सर्व 26 स्टोअर्स आणि ऑनलाइन चॅनेलवर लाइव्ह असेल. किराणा पार्टनर उत्पादनाच्या सर्व श्रेणीमध्ये उत्तम डील्सचा लाभ घेऊ शकतात. बी2बी सदस्यांना अधिक बचत करण्याची आणि नफा वाढवण्याची संधी उपलब्ध करून देण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. दिनकर अयिलावरपु, वाइस प्रेसिडेंट आणि ग्रुप हेड ऑफ स्ट्रॅटेजी अँड ट्रान्सफॉर्मेशन, हेड ऑफ फ्लिपकार्ट होलसेल, म्हणाले, "दिवाळी शॉपोत्सव किराणा सदस्यांना, विशेषतः एसएमई (लहान आणि मध्यम उद्योग) आणि इतर व्यवसाय मालकांना सणासुदीच्या काळात ग्राहकांना सेवा देत असताना जास्तीत जास्त बचत करण्याची आणि नफा वाढवण्याची एक नवीन संधी उपलब्ध करून देतो. अनुकूलित डील आणि ऑफरद्वारे, आम्ही त्यांचा व्यवसाय सुरळीत आणि फायदेशीर पद्धतीने वाढण्यास मदत करण्याचे उद्दिष्ट ठेवतो. फ्लिपकार्ट होलसेलमध्ये, आम्ही किराणा इकोसिस्टमसाठी टिकाऊ मूल्य निर्माण करण्यासाठी, त्यांचे कामकाज मजबूत करण्यासाठी आणि यश मिळवण्यासाठी त्यांना सक्षम करण्याच्या आमच्या वचनबद्धतेवर ठाम आहोत." फ्लिपकार्टच्या टॅगलाइननुसार, दिवाळी शॉपोत्सव विविध उत्पादन श्रेणींमध्ये सीझनमधील सर्वात मोठे डील्स ऑफर करण्याचे वचन देतो. या वर्षी फ्लिपकार्ट होलसेल दिवाळीचा उत्सव आणखी खास बनवण्यासाठी विविध श्रेणीतील नॅशनल आणि रिजनल ब्रँड्सवर लक्ष केंद्रित करत आहे. प्रत्येक ग्राहकाला वैयक्तिकृत खरेदीचा अनुभव देणासाठी विशिष्ट रिजनल प्राधान्यांची पूर्तता करताना, हे नवीन लॉन्च ऑफर देशभरातील ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार करण्यात आली आहेत. दिवाळी शॉपोत्सवामध्ये बंपर बक्षिसे असतील, जिथे ग्राहकांना त्यांच्या खरेदीच्या आधारे आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी मिळेल. या सेल अंतर्गत, फ्लिपकार्ट सदस्य हिरो ऑफर्स, फ्लॅट प्राइस स्टोअर, बीओजीओ ऑफर्स आणि इतर आकर्षक ऑफरद्वारे त्याच्या ऑनलाइन चॅनेलवर विविध लाभांचा आनंद घेऊ शकतात.



## थोडक्यात



### आ. शेखर निकम यांची परशुराम घाटात तातडीची पाहणी

- संरक्षक भिंतीचे काम त्वरित सुरू करण्याचे निर्देश

**चिपळुण (आरंभ पर्व) :** मुंबई-गोवा महामार्गावरील परशुराम घाटात संरक्षक भिंत खचल्याची घटना समोर आली आहे. या घटनेची माहिती मिळताच मुंबईत असलेले चिपळूण-संगमेश्वरचे आमदार शेखर निकम यांनी तातडीने मुंबईवरून परत येताच घटनास्थळी भेट दिली. घाटातील खचलेला संरक्षक भिंत पाहून त्यांनी त्वरित संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून सदर कामाची पाहणी केली आणि त्यावर तातडीने कार्यवाही सुरु करण्याचे निर्देश दिले. आ. शेखर निकम यांनी सांगितले की, "परशुराम घाट हा प्रवाशांसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. या ठिकाणी संरक्षक भिंतीचा काही भाग खचल्यामुळे वाहतूक ठप्प होऊ नये, यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करावे प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत." प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतुकीची सोय सुरळीत ठेवण्यासाठी घाटात सुरु असलेल्या कामावर आ. निकम स्वतः लक्ष ठेवणार असून, त्यासाठी स्थानिक प्रशासनासोबत समन्वय साधून तातडीने उपाययोजना करण्यात येतील असे सांगितले.




### आश्रम शाळेत अभिनव उपक्रम

**उरुळी कांचन (आरंभ पर्व) :** मातोश्री रमाई आंबेडकर प्राथमिक व माध्यमिक निवासी आश्रम शाळा नायगाव मार्ग वस्ती शिव रस्ता याठिकाणी अखिल भारतीय वारकरी मंडळ महाराष्ट्र प्रदेशचे उपाध्यक्ष समाज प्रबोधनकार ह.भ.प.आनंद महाराज तांबे यांच्या संकल्पनेतून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या 750 वा जन्मोत्सव सोहळा व 'मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा' मिळाल्याबद्दल शाळेत हरिपाठ वाटप करण्यात आले हा स्तुत्य उपक्रम राबविला. यामध्ये मराठी ला जागतिक भाषेमधील स्थान, शालेय अभ्यास क्रमात संत वाङ्:मयाचा समावेश तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे अधिक ज्ञान मिळावे हा उदत्त हेतू मनामध्ये ठेवून संत ज्ञानेश्वर माऊलींचा सार्थ हरिपाठ भेट देण्याचा संकल्प त्याचा प्रारंभ करण्यात आला. 'इये मराठीचिये नगरी.. ब्रह्मविद्येचा सुकाळ करी..घेणे देणे सुखचि वरी..हो देई या जगा' ज्ञानेश्वरी. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना ह.भ.प.आनंद महाराज तांबे यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानेशरी व संत वाड:मायचे महत्व विद्यार्थ्यांना आपल्या जीवनामध्ये किती महत्वाचे आहे हे सांगितले. तसेच या कार्यक्रमासाठी ह भ प मल्हारी गावडे, ह भ प माऊली कुंजीर, ह भ प आनंद महाराज काकडे, ह भ प श्री विलास उंद्रे, चौधरी ताई, श्री गुरुदत्त सेवा विकास प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुनिल तुपे, महालक्ष्मी एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष कादर शेख उपस्थित होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना शाळेच्या मुख्याध्यापिका शबाना शेख यांनी हा अभिनव उपक्रम शालेय विद्यार्थी दशेतच मुलांना आपल्या भाषेविषयी आवड निर्माण करणारा व भविष्यात मराठी भाषेला एका उंचीवर घेऊन जाणारा ठरेल व त्यामुळे मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करणे ही काळाची गरज आहे. आजच्या कार्यक्रमांमध्ये वारकरी मंडळातर्फे शाळेच्या मुख्याध्यापिका यांना संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची प्रतिमा व ज्ञानेश्वरी ग्रंथ माऊलींचा सार्थ हरिपाठ तसेच सर्व मुलांना व मुलींना संत ज्ञानेश्वर महाराजांचा सार्थ हरिपाठ भेट देण्यात आला.

## थोडक्यात



## वर्ल्ड आर्थरायटिस डे निमित्त विशेष जनजागृती कार्यक्रम संपन्न

**पुणे (आरंभ पर्व) :** संधिवात असलेल्या रूग्णांसाठी कार्यरत मिशन आर्थरायटिस इंडिया (माई) आणि सेंटर फॉर ऱ्हयुमॅटिक डिसीज (सीआरडी) यांच्या तर्फे रविवारी वर्ल्ड आर्थरायटिस डे निमित्त पूना क्लब येथे माईंड अँड आर्थरायटिस या संकल्पनेवर आधारित विशेष जनजागृती कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या रूबी हॉल क्लिनिकच्या क्रिटिकल केअर मेडिसिन विभागाच्या संचालिका डॉ.प्राची साठे यांनी दृकश्राव्य माध्यमातून उपस्थितांशी संवाद साधला.यावेळी मानसोपचारतज्ञ डॉ.मंजिरी दीक्षित,फिजिरोथेरपीस्ट डॉ.अपर्णा साधळे आणि संधिवात तज्ञ डॉ.अरविंद चोप्रा यांसह माईच्या संस्थापिका शरयू भट आणि संधिवात तज्ञ डॉ.वैजयंती लागू व माईच्या अध्यक्षा श्रीमती दीपा मेहता (दृकश्राव्य माध्यमातून) आदी मान्यवर उपस्थित होते. संधिवात असलेल्या लोकांना संधिवातामुळे निर्माण होणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी निरोगी मन आणि तंदुरूस्त शरीराला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे मत यावेळी तज्ञांनी व्यक्त केले.याप्रसंगी संधिवात असलेल्या रूग्णांसाठी काही साध्या सोप्या व्यायामांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. संधिवात आणि संबंधित समस्यांच्या विविध पैलूंबद्दल शास्त्रीय माहिती आणि मार्गदर्शन प्रदान करून जागरूकता निर्माण करणे हे माई चे उद्दिष्ट आहे.

## उषा वॉटर हीटर्सची नवीन श्रेणी : प्रत्येक घरासाठी विश्वसनीय सुविधा




**नवी दिल्ली (आरंभ पर्व)** : हिवाळा जवळ येत असताना, घरामध्ये गरम पाण्याची सुविधा देण्यासाठी एक विश्वसनीय वॉटर हीटर महत्त्वाची भूमिका बजावू शकते. उषा वॉटर हीटर्स टिकाऊपणा आणि कार्यक्षमतेचे मिश्रण आहे, जे अगदी थंडीच्या दिवसांतही गरम पाण्याचा पुरवठा करते. दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेले हे वॉटर हीटर्स सुरक्षित काम आणि ऊर्जा-बचत वैशिष्ट्ये ऑफर करते, जे त्यांना येणाऱ्या थंडीच्या सीझनसाठी एक उपयोगी पर्याय बनवते. सकाळची आंघोळ असो किंवा थकवा घालवण्यासाठी दिवसभरानंतरची गरम पाण्याची आंघोळ असो, हे वॉटर हीटर्स तुम्हाला हिवाळ्यातील महिन्यात गरम पाणी देण्यास मदत करण्यासाठी बनवलेले आहेत. जसजशी थंडी वाढत चालली आहे, तसतशी तुमच्या दिवसाची सुरूवात किंवा शेवट करण्यासाठी गरम, ताजेतवाने आंघोळ करण्यापेक्षा आरामदायी दुसरे काहीही असू शकत नाही. संध्याकाळचा थकवा दूर करण्यासाठी तुम्हाला आराम करायचा असेल किंवा सकाळची तयारी करायची असेल, उषा अ‍ॅक्वा होरायझन वॉटर हीटर जेव्हा तुम्हाला गरज असते तेव्हा तुमच्याकडे नेहमी गरम पाणी उपलब्ध असल्याची खात्री देतो. आधुनिक घरांसाठी डिझाइन केलेले, हे वॉटर हीटर तुमचा आंघोळीचा अनुभव वाढवण्यासाठी टेक्नॉलॉजी सोबत सौंदर्याची जोड देते, जे केवळ उबदारपणाच देत नाही तर अतुलनीय विश्वसनीयता आणि सुरक्षितता देखील देते.

## सतीश पंजाबी यांना जामीन मंजूर

**पुणे (आरंभ पर्व) :** पंजाब नॅशनल बँकेतील लॉकर चोरीच्या संदर्भात अटक करण्यात आलेल्या पुण्यातील ज्वेलर सतीश पंजाबी यांना आज पुणे सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला. या घटनेत ₹2.78 कोटींचे मौल्यवान सोने, हिरे आणि चांदीचे दागिने चोरीला गेले होते. मात्र, न्यायालयाने स्पष्ट केले की पंजाबी यांचा लॉकर उघडणे किंवा चोरीशी कोणताही संबंध नव्हता. न्यायालयीन सुनावणीदरम्यान, पंजाबी यांच्या वतीने सांगण्यात आले की त्यांना सोन्याच्या स्त्रोताबद्दल कोणतीही माहिती नव्हती आणि त्यांनी व्यवहार सर्वसामान्य सराफांच्या पद्धतीनुसार केला होता.

# सचिन दोडके मित्र परिवारातर्फे एक लाख लिटर दुधाचे वाटप

### नागरिकाकडून दोडकेंचे उपक्रमाबद्दल तोंडभरून कौतुक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून पुणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे खडकवासला मतदारसंघाचे इच्छुक उमेदवार सचिन दोडके यांच्याकडून मतदारसंघातील नागरिकांना मोफत एक लाख लिटर दूध वाटप करण्यात आले.

चार टँकरच्या मदतीने हजारो नागरिकांना याचा लाभ मिळाला. पूर्वीपासून सचिन दोडके हे वारजे माळवाडी भागामध्ये कोजागिरी पौर्णिमेनिमित्त त्यांना दूध वाटप करत असतात.

यंदा त्यांच्या सहकारी मित्र परिवाराने खडकवासला मतदारसंघातील बालाजी नगर , धायरी, वारजे, वडगाव बुद्रुक येथे दूध वाटप करण्याचा निर्णय घेतला.

वडगाव बुद्रुक येथील दूध वाटपवेळी मा.नगरसेवक

सचिन दोडके यांनी सर्वांशी संवाद साधला. अनेक नागरिकांनी आनंदित होऊन दोडके यांच्या कार्याचे कौतुक व्यक्त केले.

यावेळी वडगाव बुद्रुक येथे नाना जाधव, ऋषिकेश जाधव, यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला. यावेळी आकाश शेळके, अभी कवडे, अमोल शिंदे, संतोष हनमगर, अमोल चव्हाण , निखील सकपाळ, रुपेश भांडगिरे ,चैतन्य जाधव,अजमत खान , रुपेश बंधिर्गे यावेळी उपस्थित होते.






## पुण्यात सीआयआय नेक्सजेन मोबिलिटी एक्स्पोचे आयोजन

- अत्याधुनिक वाहन उद्योग तंत्रज्ञानाचे प्रदर्शन
- सीआयआय नेक्सजेन एक्स्पोमध्ये मोबिलिटीचे भविष्य अनुभवण्याची पश्चिम भारताला संधी - अरविंद गोयल,अध्यक्ष,टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

द कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) तर्फे मोशी मधील पुणे इंटरनॅशनल एक्झिबिशन सेंटर (पीआयईसीसी) येथे 18 ऑक्टोबर 2024 ते 20 ऑक्टोबर 2024 दरम्यान नेक्सजेन मोबिलिटी एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे. हे या एक्स्पोचे दुसरे वर्ष असून इंटिग्रेटिंग इंडियन मोबिलिटी ही या प्रदर्शनाची यंदाची संकल्पना आहे. वाहन उद्योगातील मोबिलिटीच्या जगातील अद्ययावत तंत्रज्ञान प्रदर्शित करण्यासाठी हे आघाडीचे व्यासपीठ आहे. या एक्स्पो चे अध्यक्ष व टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स लि.चे अध्यक्ष अरविंद गोयल यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या उपक्रमात इंटर्नल कंबशन इंजिन्स (आयसीई)ते इलेक्ट्रिक,हायब्रिड,सीएनजी/ एलएनजी व इथेनॉल/ बायोफ्युएल पॉवर ट्रेन्स सह वाहन व तंत्रज्ञानातील व्यापक श्रेणी प्रदर्शित होणार आहे.यामध्ये ऑटोमोबाईल कॉँपोनंटस,इलेक्ट्रॉनिक्स आणि सबसिस्टिम्समधील नाविन्यपूर्ण उत्पादने देखील बघायला मिळतील. या एक्स्पो चे अध्यक्ष व टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स लि.चे अध्यक्ष अरविंद गोयल म्हणाले की,एक्स्पो मध्ये सहभागी झालेले भागधारक आणि भेट देणाऱ्या लोकांना इलेक्ट्रिक मोबिलिटीकडे परिवर्तित होणारे प्रगत तंत्रज्ञान,इलेक्ट्रिक वाहनांचे डिझाईन्स याचा अनुभव घेता येईल.वाहन उद्योगामध्ये परिवर्तन घडविणाऱ्या नाविन्यपूर्ण संकल्पनांसह मोबिलिटीचे भविष्य या एक्स्पोमध्ये अनुभवायला मिळेल. ते पुढे म्हणाले की,या व्यासपीठाद्वारे पश्चिम भारतातील सहभागींना मोबिलिटी सोल्युशन्सच्या भविष्याला आकार देणाऱ्या उद्योगातील नेतृत्वाशी संवाद साधण्यासाठी आणि अद्ययावत वाहन तंत्रज्ञान अनुभवता येईल.




## बर्कर्टच्या पुण्यातील उत्पादन केंद्राचे उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बर्कर्ट फ्लुइड कंट्रोल सिस्टम्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने पुण्यातील नवीन उत्पादन प्रकल्पाचे नुकतेच उद्घाटन केले. ही अत्याधुनिक सुविधा बर्कर्टच्या जागतिक मूल्य साखळीत एक महत्त्वपूर्ण भर टाकणार आहे. सिस्टम सोल्यूशन्स तयार करून या क्षेत्रातील वाढती मागणी पूर्ण करणे, हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. तळेगाव एमआयडीसी, फेज दोनमधील ही नवीन सुविधा 50,000 चौरस फुटांची जागेत उभारण्यात आली असून, तिथे अत्याधुनिक मशिन, असेंब्ली लाइन्स आणि टेस्टिंग सेंटरचा अंतर्भाव करण्यात आला आहे, वर्षाला 30 हजार व्हॉल्व्ह आणि 500 सिस्टीम तयार करण्याची या प्रकल्पाची क्षमता आहे.

## टाटा हिताचीची पुण्यात नवीन इंटिग्रेटेड फॅसिलिटीचे उद्घाटन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

टाटा हिताची ची अधिकृत डीलरशिप असलेल्या इंडियन कन्स्ट्रक्शन मशिनरी प्रायव्हेट लिमिटेड ने पुणे आणि अहमदनगर या दोन्ही बाजारपेठांमधील ग्राहकांची पूर्तता करण्यासाठी पुण्यात विक्री, सेवा, सुटे भाग आणि मशीन केअरसाठी एक अत्याधुनिक इंटिग्रेटेड फॅसिलिटी सुरु केली आहे.

या अद्ययावत इंटिग्रेटेड फॅसिलिटीचे उदघाटन करताना टाटा हिताचीचे व्यवस्थापकीय संचालक संदीप सिंग म्हणाले की, ही सुविधा ग्राहकांसाठी विक्री, सेवा आणि सुटे भागांसह एकाच छताखाली सर्वकांश सेवा प्रदान करेल.

या धोरणात्मक विस्ताराचे उद्दिष्ट टाटा हिताचीची या भागात उपस्थिती आणि सेवा क्षमता अधिक बळकट करणे हे आहे. ते पुढे म्हणाले की, आमच्या ग्राहकांना वेळेवर, गुणवत्तापूर्ण सेवा आणि सुटे भाग मिळतील याची खात्री करण्यासाठी टाटा हिताची वचनबद्ध आहे.

पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यांतील ग्राहकांना सेवा देत असलेले इंडियन कन्स्ट्रक्शन मशिनरी प्रायव्हेट लिमिटेड हे 2022 पासून टाटा हिताचीचे विश्वसनीय भागीदार आहे. लोणी कंद, पुणे येथे नव्याने सुरु करण्यात आलेली ही सुविधा स्ट्रक्चरल वेल्डिंग, इंजिन दुरुस्ती आणि हायड्रोलिक मेंटेनन्ससह संपूर्ण मशीन ओव्हरहॉल सारख्या सेवा प्रदान करण्यासाठी सुसज्ज आहे.

## पुण्यात सीआयआय नेक्सजेन मोबिलिटी एक्स्पोचे आयोजन

- अत्याधुनिक वाहन उद्योग तंत्रज्ञानाचे प्रदर्शन
- सीआयआय नेक्सजेन एक्स्पोमध्ये मोबिलिटीचे भविष्य अनुभवण्याची पश्चिम भारताला संधी - अरविंद गोयल,अध्यक्ष,टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

द कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) तर्फे मोशी मधील पुणे इंटरनॅशनल एक्झिबिशन सेंटर (पीआयईसीसी) येथे 18 ऑक्टोबर 2024 ते 20 ऑक्टोबर 2024 दरम्यान नेक्सजेन मोबिलिटी एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे. हे या एक्स्पोचे दुसरे वर्ष असून इंटिग्रेटिंग इंडियन मोबिलिटी ही या प्रदर्शनाची यंदाची संकल्पना आहे.

वाहन उद्योगातील मोबिलिटीच्या जगातील अद्ययावत तंत्रज्ञान प्रदर्शित करण्यासाठी हे आघाडीचे व्यासपीठ आहे. या एक्स्पो चे अध्यक्ष व टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स लि.चे अध्यक्ष अरविंद गोयल यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या उपक्रमात इंटर्नल कंबशन इंजिन्स (आयसीई)ते इलेक्ट्रिक,हायब्रिड,सीएनजी/ एलएनजी व इथेनॉल/ बायोफ्युएल पॉवर ट्रेन्स सह वाहन व तंत्रज्ञानातील व्यापक श्रेणी प्रदर्शित होणार आहे.यामध्ये ऑटोमोबाईल कॉँपोनंटस,इलेक्ट्रॉनिक्स आणि सबसिस्टिम्समधील नाविन्यपूर्ण उत्पादने देखील बघायला मिळतील. या एक्स्पोचे अध्यक्ष व टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स लि.चे अध्यक्ष अरविंद गोयल म्हणाले की,एक्स्पो मध्ये सहभागी झालेले भागधारक आणि भेट देणाऱ्या लोकांना इलेक्ट्रिक मोबिलिटीकडे परिवर्तित होणारे प्रगत तंत्रज्ञान,इलेक्ट्रिक वाहनांचे डिझाईन्स याचा अनुभव घेता येईल. वाहन उद्योगामध्ये परिवर्तन घडविणाऱ्या नाविन्यपूर्ण संकल्पनांसह मोबिलिटीचे भविष्य या एक्स्पोमध्ये अनुभवायला मिळेल.

### एकाच वेळी आयोजित करण्यात आलेली प्रदर्शने

- ऑटो शो 2024 : भारताला जागतिक अभिनवतेचे केंद्र म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या तंत्रज्ञान आधारित सोल्युशन्सचे प्रदर्शन
- फ्युएल ऑफ फ्युचर शो 2024 : भारताच्या उर्जा आणि पर्यावरण संबंधित आव्हानांवर प्रभावी असणाऱ्या ग्रीन हायड्रोजन आणि बायो-इथेनॉलसारख्या पर्यायी आणि शाश्वत इंधनांवर भर देणारे प्रदर्शन
- अर्बन मोबिलिटी शो 2024 : ई -बसेस,ई -बाईक्स व ई-रिक्षा या शहरी ट्रान्सपोर्टेशन सोल्युशन्स अधोरेखित करणारे प्रदर्शन
- वाहन प्रेमींसाठी भव्य प्रदर्शन : हाय अँन्ड लक्झरी कार्स ते कस्टम बिल्ट ऑफरोडर्स, सीआयआय नेक्सजेन मोबिलिटी एक्स्पो 2024 मध्ये प्रत्येक वाहन प्रेमीसाठी काही ना काहीतरी आहे.भेट देणाऱ्या लोकांना क्लासिक व्हेईकल्स,भविष्यकेंद्रित डिझाईन्स आणि ग्लोबल ऑटोमोटिव्ह इनोव्हेशन सह मोबिलिटीच्या भविष्याला आकार देणारे प्रगत तंत्रज्ञानाचे प्रदर्शन.

# फिजिक्सवाला 77 नवीन तंत्रज्ञान-सक्षम विद्यापीठ ऑफलाइन सेंटर्स लाँच करणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

फिजिक्सवाला (पीडब्ल्यू) ही भारतातील आघाडीची मल्टीनॅशनल एडटेक कंपनी भारतात किफायतशीर, उच्च दर्जाच्या शिक्षणाचे लोकशाहीकरण करण्याप्रती कटिबद्ध आहे. या कंपनीने शैक्षणिक वर्ष 25-26 साठी देशभरात 77 हून अधिक ऑफलाइन तंत्रज्ञान-सक्षम अध्ययन केंद्रांच्या लाँचची घोषणा केली आहे. ही नवीन केंद्रे तामिळनाडू, गुजरात, जम्मू व काश्मीर, राजस्थान, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र या राज्यांमध्ये कार्यरत असतील. या विस्तारीकरणासह पीडब्ल्यूची ऑफलाइन फूटप्रिंट दुप्पट होऊन 141 शहरांमध्ये 203 केंद्रे असतील, ज्यामुळे सध्याच्या 126 विद्यापीठ व पाठशाला केंद्रांमध्ये अधिक भर होईल. या धोरणात्मक विस्तारीकरणाच्या माध्यमातून पीडब्ल्यूचा दर्जेदार शिक्षण अधिक प्रमाणात उपलब्ध करून देण्याचा मनसुबा आहे, जेथे विशेषत: द्वितीय व तृतीय श्रेणीच्या शहरांमधील विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित आहे. यामधून दर्जेदार शिक्षण देशभरातील सर्वात वंचित भागांपर्यंत पोहोचण्याची खात्री मिळेल.




शैक्षणिक वर्ष 24-25 मध्ये 200,000 हून अधिक विद्यार्थ्यांनी पीडब्ल्यूच्या विद्यापीठ आणि पाठशाला केंद्रांमध्ये नोंदणी केली, ज्यामधून संपूर्ण भारतात शिक्षणाचे लोकशाहीकरण करण्याप्रती पीडब्ल्यूच्या मिशनवरील वाढता विश्वास दिसून येतो. पीडब्ल्यूचा आगामी शैक्षणिक वर्षामध्ये आणखी 250,000 विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा मनसुबा आहे आणि प्रत्येक विद्यार्थ्याला प्रगती करण्यासाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन व संसाधने प्रदान करण्याप्रती समर्पित आहे. यामधून खात्री मिळते की, शिक्षण सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे साधन बनले असून सर्वांना समान संधी देते. सध्या, पीडब्ल्यूचा एक विद्याथ देशभरातील प्रत्येक आयआयटी आणि एम्समध्ये (AIIMS) आहे.

पीडब्ल्यूचा ऑफलाइन विभाग दोन मॉडेल्समध्ये विभागण्यात आला आहे - विद्यापीठ (व्हीपी) आणि पाठशाला (पीएस). विद्यापीठ तंत्रज्ञान-सक्षम ऑफलाइन केंद्रे आहेत, जेथे विद्यार्थी अनुभवी शिक्षकांकडून अध्यापन केले जाणाऱ्या वर्गांमध्ये व्यक्तिश: उपस्थित राहतात. पाठशाला मॉडेल अद्वितीय दोन-शिक्षक सिस्टमसह अधिक नाविन्यपूर्ण दृष्टिकोन देते. पाठशाला केंद्रांमध्ये व्हर्च्युअली उपस्थित असलेल्या शिक्षकांद्वारे अध्यापन केले जाणाऱ्या प्रत्यक्ष वर्गांमध्ये उपस्थित राहतात, तर दुसरे शिक्षक प्रत्यक्ष वर्गांमध्ये उपस्थित असतात, जे विद्यार्थ्यांच्या शंका व चौकशीचे निराकरण करतात. या मॉडेलमुळे विद्यार्थ्यांना त्यांचे भौगोलिक स्थान कोणतेही असो प्रतिष्ठित शिक्षकांच्या कौशल्याचा फायदा मिळतो. दोन्ही मॉडेल्सना एकत्र करत पीडब्ल्यूने डिजिटल व प्रत्यक्ष अध्ययन वातावरणांना एकत्र आणले आहे, जेथे देशाच्या कानाकोपऱ्यामध्ये दर्जेदार शिक्षण सतत उपलब्ध करून दिले जाते.

फिजिक्सवाला (पीडब्ल्यू) च्या ऑफलाइनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित गुप्ता म्हणाले, पीडब्ल्यूमध्ये आम्ही नेहमी विद्यार्थ्यांच्या गरजा व स्वास्थ्याला प्राधान्य देतो. अधिक केंद्रांचे उद्घाटन करत आमचा विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासाठी लांबचा प्रवास करावा लागणार नाही याची खात्री घेण्याचा मनसुबा आहे, ज्यामुळे त्यांच्यावर आर्थिक भार येणार नाही. आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे आमचा मानसिक व भावनिक तणाव दूर करण्याचा मनसुबा आहे, जो विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दुसऱ्या शहरामध्ये किंवा राज्यामध्ये स्थलांतरित होताना सामना करावा लागतो. हा तणाव दूर करण्यासाठी आम्ही देशभरात अधिक शैक्षणिक हब्स निर्माण करत आहोत. फिजिक्सवाला (पीडब्ल्यू)ने नुकतेच नॅशनल स्कॉलरशिप कॉमन अ‍ॅडमिशन टेस्ट (एनएसएटी) 2024 चे तिसरे पर्व आयोजित केले.

ही टेस्ट ऑनलाइन व ऑफलाइन पर्यायांमध्ये घेण्यात आली, ज्यामुळे सर्व पात्र विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध झाले.

ही परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी 250 कोटी रुपयांचा स्कॉलरशिप निधी राखून ठेवण्यात आला होता, ज्यामुळे ही सर्वात मोठी स्कॉलरशिप टेस्ट ठरली. या उपक्रमाचा नीट-यूजी (NEET-UG) आणि आयआयटी-जेईई (IIT-JEE) परीक्षांमध्ये उत्तीर्ण होण्याची महत्त्वाकांक्षा असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या आर्थिक स्थितीकडे न पाहता शिक्षण व तज्ञ मार्गदर्शन देत मदत करण्याचा मनसुबा आहे.

## थोडक्यात



### विविध घटकांच्या पाठिंब्याने राष्ट्रवादी काँग्रेस सक्षम होतोय

**पुणे (आरंभ पर्व) :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ऑल इंडिया जमात-ए-सलमानी समाजाने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला देशभरात बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. सलमानी समाजासह बंजारा समाज, कामगार वर्ग, अल्पसंख्याक समाज राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठीशी उभे राहत असल्याने पक्ष अधिक सक्षम होत असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व्यापक होत आहे, असे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा यांनी बुधवारी सांगितले. ऑल इंडिया जमात-ए-सलमानी समाजाचे संमेलन घोले रस्त्यावरील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक सभागृहात आयोजिले होते. प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दीपक मानकर, ऑल इंडिया जमात-ए-सलमानी समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. जरीफ अहमद सलमानी, राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. आफताब आलम, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रियाज आलम सलमानी, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव हसमत अली सलमानी, पुणे शहराध्यक्ष समीर चांदेरे, राकेश कामठे, परबजित सिंग, जावेद इनामदार, मोहसीन शेख आदी उपस्थित होते.

# डीयूडिजिटल ग्लोबल ने मुंबईत थाई व्हिसा अर्ज केंद्र केले सुरु

## नवीन केंद्र तुमच्या दारात व्हिसा सेवा देणारी "तुम्हाला पाहिजे तेथे व्हिसा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

व्हिसा प्रॉसेसिंग, इमिग्रेशन आणि ग्लोबल कंपनी निर्मितीमध्ये विशेष सेवा प्रदान करणाऱ्या आघाडीच्या कंपनी डीयूडिजिटल ग्लोबल ने आज मुंबईत आपले नवीन व्हिसा अर्ज केंद्र (व्हीएसी) सुरू करण्याची घोषणा केली. केंद्राचे उद्घाटन एका निर्णायक वेळी होत आहे, कारण 2040 पर्यंत भारतातून बाहेर पडणाऱ्या भारतीय नागरिकांची संख्या 90 दशलक्षपर्यंत वाढेल असे अंदाज दर्शविले जात आहे. या वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी, व्हीएसी थायलंडवर विशेष लक्ष केंद्रित करून व्हिसा अर्जांवर प्रक्रिया करेल.

लोअर परेलमध्ये स्थित ही नवीन सुविधा नवीनतम तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे आणि दररोज 2000 पेक्षा जास्त व्हिसा अर्ज हाताळण्यासाठी या क्षेत्रातील व्हिसा प्रक्रियेत क्रांती घडवून आणण्यासाठी सज्ज आहे. तब्बल 2000 स्क्वेअर फूट पसरलेले, हे नवीन व्हीएसी केवळ सेवा वितरणच वाढवणार नाही तर स्थानिक अर्थव्यवस्थेतही भरीव योगदान देईल. या केंद्राचे उद्घाटन थायलंडच्या उप-महावाणिज्यदूत मिस नट्टासुदा मेटाप्रसेर्ट आणि थायलंडच्या पर्यटन प्राधिकरणाचे डायरेक्टर श्री इसाडा साओवरोस यांच्या हस्ते झाले. आपला उत्साह व्यक्त करताना, डीयूडिजिटल ग्लोबल चे सीईओ श्री. मनोज धर्मानी म्हणाले, "आमचे नवीन व्हिसा अर्ज केंद्र या प्रदेशातील व्हिसा आणि कॉन्सुलर सेवांची वाढती मागणी पूर्ण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. आम्ही आमच्या अर्जदारांना कार्यक्षम आणि त्रासमुक्त सेवा देण्यासाठी वचनबद्ध आहोत. आम्ही मुंबईतील ऑपरेशन्स स्केल करत असताना, आम्हाला सतत सुधारण्यात मदत करण्यासाठी फीडबॅक आणि सूचनांचे स्वागत करतो. आमचा विश्वास आहे की हा व्हीएसी व्हिसा अर्ज प्रक्रिया सुव्यवस्थित करून ग्राहकांचा अनुभव वाढवेल, ज्यानेकरून प्रवासी आणि भारतीय डायस्पोरा दोघांनाही फायदा होईल. आजच्या इंटरकनेक्टेड जगात, प्रवास आवश्यक आहे आणि थायलंड हे भारतीय नागरिकांसाठी पसंतीचे ठिकाण राहिले आहे."

श्री धर्मानी पुढे पुढे म्हणाले, "तुम्हाला पाहिजे तेथे व्हिसा (व्हिसा व्हेअरेव्हर यू व्हॉन्ट ) ही सर्विस थेट तुमच्या दारापर्यंत पोहोचवणारी सेवा सादर करण्यास आम्ही उत्सुक आहोत. अर्जदार सहजपणे घरबसल्या अर्ज करू शकतात आणि व्हिसा त्यांच्या घरापर्यंत पोहचेल."

स्टँडर्ड व्हिसा सर्विसेस व्यतिरिक्त, हा केंद्र डेस्टिनेशन थायलंड व्हिसासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदारांना पाच वर्षांच्या मल्टीपल एंट्री वैलिडिटी सह मदत करेल. एक समर्पित प्रीमियम लाउंज एलिवेटेड सर्विस लेवल शोधणाऱ्यांसाठी वैयक्तिकृत समर्थन आणि आरामदायक वातावरण प्रदान करतो. डीयूडिजिटल ग्लोबल ने मेट्रो शहरांमध्ये आपला ठसा वाढवल्यामुळे, हे नवीन केंद्र व्हिसा अर्ज प्रक्रिया अधिक सुलभ, कार्यक्षम आणि वाढत्या प्रवाशांसाठी सोयीस्कर बनवण्यासाठी तयार आहे. अत्याधुनिक एन्क्रिप्शन आणि डेटा प्रोटेक्शन सिस्टम सर्व अर्जदारांच्या माहितीची गोपनीयता सुनिश्चित करून सुरक्षितता ही सर्वोच्च प्राथमिकता राहिली आहे.




दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.